D- 26/2/2020
तक्रार क्र. 66

319

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

---

क्र.: सी/कार्या-2 आय/टे-8/कावि- 375,376,377,378/19
दिनांक : १२/०२/२०२० 002249

**प्रति,**

सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन नियंत्रण समिती
तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
302, वेक फिल्ड हाऊस, 3 रा मजला,
ब्रिटानिया रेस्टॉरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट , मुंबई -01

**विषय :** Destruction of Mangroves at Carter Road Bandra, Mumbai ...

**संदर्भ :** १.आपलेकडील ई-मेल संदेशान्वये श्री. स्टॅलीन डी. यांची तक्रार.
२. उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल क्र. उविअ/का-५/कां.त.पु.अहवाल/२०१९ दिनांक ०७/०२/२०१९.

Steno.

प्रस्तुत विषयांकित प्रकरणाबाबत आपलेकडील संदर्भ क्र. १ अन्वये श्री. स्टॅलीन डी. यांची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाला असून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० आणि १७/०९/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर तक्रारीबाबत चौकशी केली असून त्याबाबतचा विहीत नमुन्यातील अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| ०१ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. स्टॅलीन डी. |
| ०२ | तक्रारीचा विषय | Destruction of Mangroves at Carter Road Bandra, Mumbai |
| ०३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा: स.नं. , गावाचे नाव, तालुका. | मौजे दांडा, ता. अंधेरी येथील न.भु.क्र. सी/१६६२ |
| ०४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | श्रीमती दर्शना शिवगण, तलाठी दांडा व परिरक्षण भूमापक वांद्रे, वनपाल अंधेरी, मुंबई कांदळवन संधारण घटक. |
| ०५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | सदर प्रकरणी उपरोक्त नमूद अधिकारी यांनी स्थळपाहणी केली असून त्यानूसार मौजे दांडा, ता. अंधेरी येथील न.भु.क्र. सी/१६६२ कार्टर रोड, वांद्रे येथे कांदळवन क्षेत्रात अनधिकृत गतिविधी होत असलेबाबत तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कांदळवन कक्षाचे अधिकारी व नगर भूमापन अधिकारी व नगर भूमापन कार्यालय वांद्रे यांचे परिरक्षण भूमापक, तलाठी दांडा तसेच तक्रारदार श्री. स्टॅलन डी. यांनी ईमेल द्वारे दि. १८/०६/२०१९ रोजी दिलेले पत्र व स्थळपाहणीच्या दिवशी तलाठी दांडा यांनी फोन करुन संयुक्त स्थळपाहणी करण्यासाठी अवगत करण्यात आले. परंतु त्यांनी स्थळपाहणीसाठी येता येणार नाही, असे सांगितले. |

DCF(M)

Surveyor

28/2

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक- 4379
दिनांक- 26/2/2020
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

| | | |
|---|---|---|
| | | सदर प्रकरणी मौजे दांडा, ता. अंधेरी येथील न.भु.क्र. सी/१६६२ कार्टर रोड, वांद्रे येथे कांदळवनाची तोड, झाल्याचे दिसुन आले नाही. सदर ठिकाणी सुशोभिकरणाचे काम सुरु असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. सदरची जागा ही खाडीपैकी असून त्याचा न.भू.क्र. सी-१६६२ असा आहे. विषयांकीत मिळकतीवर कोठेही कांदळवनाची तोड झालेली दिसून येत नाही. तरी सदरची तक्रार ही कांदळवन ऱ्हासाबाबत नसुन अनधिकृत गतविधी होत असल्याबाबतची आहे.<br>तसेच प्रस्तुत प्रकरणी पुन्हा स्थळपाहणी करण्याचे निर्देश दिले असता दि. २५/०७/२०१९ रोजी तलाठी सझा दांडा यांनी स्थळपाहणी केली. सदर तक्रारीत नमुद मिळकती ही मौजे वांद्रे मधील नवीन न.भू.क्र. १६६२ मधील खाडीपैकी असून स.क्र. ७/१२ नाही. उक्त जागा ही समुद्रातील कांदळवनाची झाडे कार्टर रोडला जोडून तयार करण्यात आलेल्या जॉगिंग ट्रॅकच्या मध्ये आहे. या जागेवर तिवरांची झाडे व भरतीसोबत वाहून आलेली वाळू, दगड, कचरा इत्यादीमुळे समुद्राचे पाणी पोहचत नसल्याचे दिसून येते त्यामुळे कांदळवनाच्या झाडांची हानी होण्याची शक्यता असल्याने मा. वनपरीक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष पश्चिम उपनगर यांचे कार्यालय यावर उपाययोजना करणेकामी तहसीलदार अंधेरी यांनी कळविले आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांनी दिनांक ३०/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे. |
| ०६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | - |
| ०७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबधित पोलिस ठाण्याचे नाव | - |
| ०८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्याक्तीचीं नावे व पत्ता | - |
| ०९ | कोणत्या कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | - |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा, उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल व अनुषंगीक कागदपत्रे पृष्ठ क्र. ०१ ते ---- पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर केलेली आहेत.

( वंदना मकू )

**अपर चिटणीस, मुंबई उपनगर**

**स्थळ प्रतिवर मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांची सही असे.**

**प्रत :** मा. अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन नियंत्रण समिती तथा विभागीय आयुक्त,कोंकण विभाग, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीसाठी.

[redacted]पविभागीय अधिकारी मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत,बांद्रा (पु) ,मुंबई ४०० ०५१ .

क्र. उविअ/का-५/कां. त. पु.अहवाल/२०१९
दि.०७/०२/२०२०

प्रति,
**मा.जिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा**

विषय :- कांदळवन ऱ्हासाबाबत...
Destruction of Mangroves at Carter Road, Bandra, Mumbai.

संदर्भ :-१. आपले कडील पत्र क्र. सी/कार्या-२आय/टे-८/कावि-३७५, ३७६, ३७७, ३७८/१९ दि.०६/०५/२०१९, जा.क्र. ५६२६
२. तहसीलदार अंधेरी यांचे कडील पत्र क्र.तह /अंधेरी/ जमीन / कावि-४७१ /२०१९, दि. ०२/०८/२०१९

मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपातरीत जनहीत याचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आपल्या कडील संदर्भिय पत्र क्र. १ सोबत प्राप्त झालेल्या श्री.स्टॅलीन डी यांनी कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार अंधेरी यांनी संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने या कार्यालयाचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करित आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.स्टॅलीन डी. यांनी ई-मेल द्वारे केलेली तक्रार |
| २ | तक्रारीचा विषय | कार्टर रोड, वांद्रे या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास होत असलेबाबत. |
| ३ | संबधित तक्रारीशी जागेचा तपशिल उदा.स.न.गावाचे नांव तालुका | मौजे दांडा, ता. अंधेरी येथील न.भु.क्र. सी/१६६२ |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनांम | श्रीमती दर्शना शिवगण, तलाठी दांडा व परिरक्षण भूमापक वांद्रे, वनपाल अंधेरी, मुंबई कांदळवन संधारण घटक. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ५ | चौकशी मध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | मौजे दांडा, ता. अंधेरी येथील न.भु.क्र. सी/१६६२ कार्टर रोड, वांद्रे येथे कांदळवन क्षेत्रात अनधिकृत गतिविधी होत असलेबाबत तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कांदळवन कक्षाचे अधिकारी व नगर भूमापन अधिकारी व नगर भूमापन कार्यालय वांद्रे यांचे परिरक्षण भूमापक, तलाठी दांडा तसेच तक्रारदार श्री. स्टॅलन डी. यांनी ईमेल द्वारे दि. १८/०६/२०१९ रोजी दिलेले पत्र व स्थळपाहणीच्या दिवशी तलाठी दांडा यांनी फोन करुन संयुक्त स्थळपाहणी करण्यासाठी अवगत करण्यात आले. परंतु त्यांनी स्थळपाहणीसाठी येता येणार नाही असे सांगितले.<br>मौजे दांडा, ता. अंधेरी येथील न.भु.क्र. सी/१६६२ कार्टर रोड, वांद्रे येथे कांदळवनाची तोड, झाल्याचे दिसुन आले नाही. सदर ठिकाणी सुशोभिकरणाचे काम सुरु असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. सदरची जागा ही खाडीपैकी असून त्याचा न.भू.क्र. सी-१६६२ असा आहे. विषयांकीत मिळकतीवर कोठेही कांदळवनाची तोड झालेली दिसून येत नाही. तरी सदरची तक्रार ही कांदळवन ऱ्हासाबाबत नसुन अनधिकृत गतविधी होत असल्याबाबतची आहे.<br>तसेच प्रस्तुत प्रकरणी पुन्हा स्थळपाहणी करण्याचे निर्देश दिले असता त्यांनी दि. २५/०७/२०१९ रोजी तलाठी सझा दांडा यांनी स्थळपाहणी केली. सदर तक्रारीत नमुद मिळकती ही मौजे वांद्रे मधील नवीन न.भू.क्र. १६६२ मधील खाडीपैकी असून तीला स.क्र. ७/१२ नाही. उक्त जागा ही समुद्रातील कांदळवनाची झाडे कार्टर रोडला जोडून तयार करण्यात आलेल्या जॉगिंग ट्रॅकच्या मध्ये आहे. या जागेवर तिवरांची झाडे व भरतीसोबत वाहून आलेली वाळू, दगड, कचरा इत्यादीमुळे समुद्राचे पाणी पोहचत नसल्याचे दिसून येते, व त्यामुळे कांदळवनाच्या झाडांची हानी होण्याची शक्यता असल्याने मा. वनपरीक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष पश्चिम उपनगर यांचे कार्यालय यावर उपाययोजना करणेकामी तहसीलदार अंधेरी यांनी कळविले आहे. |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | नाही. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलीस स्थानकाचे नांव | निरंक |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यंक्तींची नावें व पत्ता. | निरंक |
| ९ | कोणत्या कायद्याअंतर्गत /कलमाअंतर्गत गुन्हा नोद दाखल केला त्यांचे वर्णन. | निरंक |

सोबत तहसीलदार अंधेरी यांचा अहवाल पान क्र. १ ते ०७ माहितीसाठी सविनय सादर.

(उमेश बिरारी)
**उपविभागीय अधिकारी**
**मुंबई पश्चिम उपनगर**

Scanned by CamScanner

# तहसीलदार अंधेरी यांचे कार्यालय

दादाभाई नौरोजी मार्ग, अंधेरी (पश्चिम), मुंबई- ४०० ०५८.

दुरध्वनी क्र. ०२२ २६२३१३६८ ईमेल आयडी- [illegible]

क्र.तह/अंधेरी/तमान/कार्या-[illegible]/२०२१
दि.०७/०८/२०२१

प्रति,—
मा.उपविभागीय अधिकारी,
मुंबई पश्चिम उपनगर जिल्हा.

विषय:- कांदळवन न्हासाबाबत.
Destruction of Mangroves at Carter Road Bandra, Mumbai

संदर्भ:-१) मा.आपलेकडील पत्र क्रमांक टांव अ/का-५/कावि-[illegible]/२०२१, दि.१०/०६/२०२१
२) या कार्यालयाकडील समक्रमांकाचे पत्र दिनांक २७/०६/२०२१

महोदय,

मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेल्या निर्णयातील रुपांतरीत जनहित याचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक १७/०९/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्टर रोड, बांद्रा या ठिकाणी कांदळवनाचा न्हास होत असल्याबाबत अर्जदार श्री.स्टॅलीन डी यांचे तक्रारीच्या अनुषंगाने [illegible] करुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर तपशिल पुढील प्रमाणे सविनय सादर करणेत येत आहे

कांदळवन तक्रारीचा तपशिल:-

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.स्टॅलीन डी. यांनी ईमेल व्दारे केलेली तक्रार. |
| २ | तक्रारीचा विषय | कार्टर रोड, बांद्रे या ठिकाणी कांदळवनाचा न्हास होत असलेबाबत. |
| ३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.न.गावाचे नांव तालुका | मौजे दांडा, ता.अंधेरी न.भु.क्र.[illegible] |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनांम | श्रीम.दर्शना शिवगण, तलाठी दांडा व परिरक्षण भूमापक बांद्रे, वनपाल अंधेरी, मुंबई कांदळवन संधारण घटक |
| | चौकशी मध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | उपरोक्त विषयांकित प्रकरणी यापूर्वी या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक २७/०६/२०२१ रोजीच्या पत्राने खालील प्रमाणे अहवाल सादर करणेत आलेला आहे.<br>श्री.स्टॅलीन डी. यांनी मौजे दांडा ता.अंधेरी, येथील कार्टर रोड, बांद्रे येथे कांदळवन क्षेत्रात अनधिकृत गतिविधी होत असलेबाबत तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कांदळवन कक्षाचे अधिकारी व नगर भूमापन अधिकारी व नगर भूमापन कार्यालय बांद्रे यांचे परीरक्षण भूमापक, तलाठी दांडा तसेच तक्रारदार श्री.स्टॅलीन डी. यांनी ईमेल व्दारे दि.२८/०६/२०२१ रोजी दिलेले पत्र व स्थळपाहणीच्या दिवशी तलाठी दांडा यांनी फोन करुन संयुक्त स्थळपाहणी करण्यासाठी अवगत करण्यात आले. परंतु त्यांनी स्थळपाहणी साठी येता येणार नाही असे सांगितले. स्थळपाहणी वेळी पुढील प्रमाणे वस्तुस्थिती आढळुन आली.<br>मौजे दांडा ता.अंधेरी येथील कार्टर रोड, बांद्रे येथे कांदळवनाची तोड, झाल्याचे दिसुन आले नाही. सदर ठिकाणी सुशोभिकरणाचे काम सुरु असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन आले. सदरची जागाही खाडीपैकी असुन त्याचा न.भु.क्र.[illegible] असा |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. विषयांकीत मिळकतीवर फोटोही कांदळवनाची तोड झालेली दिसुन येत नाही. तरी सदरची तक्रार ही कांदळवन ऱ्हासाबाबत नसुन अनधिकृत गतविधी होत असल्याबाबतची आहे. या प्रमाणे अहवाल सादर करणेत आलेला आहे.<br>सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्रकरणी पुन्हा चौकशी करणेबाबत निर्देश देण्यात आले होते, त्यानुषंगाने तलाठी सझा दांडा यांनी दि.२५/०७/२०१९ रोजी कांदळवन कक्ष यांचेकडील अधिकारी, यांचेसोबत संयुक्त स्थळपाहणी करुन खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे. स्थळपाहणीसाठी श्री.स्टॅलीन डी. यांना भ्रमणध्वनी करुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी भ्रमणध्वनी उचलला नाही. त्यामुळे त्यांचे अनुपस्थितीत स्थळपाहणी करण्यात आली.<br>सदर तक्रारीत नमुद मिळकत ही मौजे वांद्रे मधील नवीन न.भू.क्र.१६६२ मधील मधील खाडीपैकी असुन तीला सर्वे क्र.७/१२ नाही. उक्त जागा ही समुद्रातील कांदळवनाची झाडे कार्टर रोडला जोडुन तयार करण्यात आलेल्या जॉगिंग ट्रॅकच्या मध्ये आहे. या जागेवर तिवरांची झाडे व भरतीसोबत वाहून आलेली वाळू, दगड, कचरा, इत्यादी असल्याचे निदर्शनास आले. तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे या भागामध्ये भरतीसोबत वाहून आलेली वाळू, दगड, कचरा इत्यादीमुळे समुद्राचे पाणी पोहचत नसल्याचे दिसुन येते, व त्यामुळे कांदळवनाची हानी होण्याची शक्यता आहे. या प्रमाणे अहवाल सादर करणेत आलेला आहे. तलाठी दांडा यांचे अहवालाचे अवलोकन करुन भरतीसोबत वाहून आलेली वाळू, दगड,कचरा इ. मुळे कांदळवनाची हानी होण्याची शक्यता असल्याने याबाबत मा.वनपरीक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष पश्चिम उपनगर यांचे कार्यालयास यावर उपाययोजना करणेकामी सदर पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तरी सदरचा अहवाल माहितीसाठी सविनय सादर. |
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | नाही. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलीस स्थानकाचे नांव | निरंक |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नावे व पत्ता. | निरंक |
| ९ | कोणत्या कायद्याअंतर्गत /कलमाअंतर्गत गुन्हा नोद दाखल केला त्यांचे वर्णन. | निरंक |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात आली असुन सोबत पंचनामा व तलाठी अहवाल सोबत जोडत आहे. तरी पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

तहसीलदार अंधेरी

प्रत : मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना माहितीसाठी सविनय सादर.

तहसीलदार अंधेरी

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंधेरी यांचे कार्यालय

दादाभाई नौरोजी रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई – ४०००५८

दुरध्वनी क्रमांक- 022-26231368

ई-मेल आयडी - tahsildarandheri@gmail.com

कांदळवन/महत्वाचे

क्र.तह/अंधेरी/जमीन/कावि-४७१/२०१८
दिनांक:-०२/०८/२०१९

प्रति,
मा.वनपरीक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष, पश्चिम उपनगर,
स.नं.१४७, पंचम सोसायटी जवळ, गोखले महाविद्यालय,
गोराई बोरीवली (प), मुंबई -४०० ०९१.

विषय:- Destruction of Mangroves at Carter road Bandra, Mumbai

संदर्भ:-१) मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्रमांक कार्या-२आंय/टे-८/कावि-३७५/३७६/३७७/३७८/२०१९, दि.०६/०५/२०१९

२) मा.उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील पत्र क्रमांक उविअ/कावि-४१३/२०१९, दि.१०/०६/२०१९

३) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दि.१७/०६/२०१९

४) तलाठी सझा दांडा यांचेकडील अहवाल दि.२५/०७/२०१९

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र.०२ अन्वये प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.०३ नुसार दि.२५/०७/२०१९ रोजी संयुक्त स्थळपाहणी आयोजित करणेत आली होती. त्यानुषंगाने संदर्भ क्र.०४ नुसार तलाठी सझा दांडा यांनी आपले कार्यालयातील कर्मचारी यांचेसमवेत संयुक्त स्थळपाहणी करुन खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

सदर तक्रारीत नमुद मिळकत ही मौजे वांद्रे मधील नवीन न.भू.क्र.सी १६६२ मधील खाडींपैकीची असुन तीला सर्वे क्र.(७/१२) नाही. उक्त जागा ही समुद्रातील कांदळवनाची झाडे व कार्टर रोडला जोडुन तयार करण्यात आलेल्या जॉगिंग ट्रॅकच्या मध्ये आहे. या जागेवर तिवरांची झाडे व भरतीसोबत वाहून आलेली वाळू, दगड, कचरा इ.असल्याचे निर्देशनास आले. तक्रारीमध्ये नमुद केल्याप्रमाणे या भागामध्ये भरतीसोबत वाहून आलेली वाळू, दगड कचरा इत्यादी मुळे समुद्राचे पाणी पोहचत नसल्याने दिसुन येते व त्यामुळे कांदळवनाची हानी होण्याची शक्यता आहे. या प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

त्यानुषंगाने तलाठी दांडा यांचे अहवालाचे अवलोकन केले असता भरतीसोबत वाहून आलेली वाळू, दगड, कचरा इ. कांदळवनाची हानी होण्याची शक्यता असल्याचे कळविले आहे. तरी याबाबत आपले स्तरावरुन उपाययोजना करणेस विनंती व याबाबतचाआपला अहवाल या कार्यालयास सादर करावा.

तहसीलदार अंधेरी

१) मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

सही/-
तहसीलदार अंधेरी

Scanned by CamScanner

स्थळ: कार्टर रोड
दिनांक २५/०७/२०१८

# पंचनामा

तलाठी सजा दांडा यांचेसमक्ष,

आम्ही खालील सह्या करणारे पंचलोक स्थळ कार्टर रोड, ॲड. कमिशनर ऑफिसच्या समोर, बांद्रे (प.) मुंबई - ४०० ०५० आज दिनांक २५/०७/२०१८ रोजी समक्ष हजर राहून कारणे विचारलेवरुन लिहून देतो की,

मा. तहसीलदार अंधेरी यांचेकडील पत्र क्र. तह/अंधेरी/जमीन/कावि-४७१/२०१८ दि. १७/०७/२०१८ व श्री. स्टॅलिन डी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वर नमुद पत्त्यावर जाऊन संयुक्त स्थळपहाणी करण्यात आली. या स्थळपहाणीसाठी कांदळवनकक्षाचे अधिकारी व तलाठी दांडा यांनी हजर होते. श्री. स्टॅलीन डी यांना संपर्क साधला असता त्यांनी फोन उचलला नाही त्यामुळे सदर स्थळपहाणी त्यांच्या अनुपस्थितीत पूर्ण करण्यात आली.

जागेवर आजरोजी कांदळवनाची झाडे आहेत. सदरील झाडे व कार्टर रोडला जोडून तयार करण्यात आलेल्या जॉगिंग ट्रॅकच्या रस्त्यामध्ये असलेल्या जागेत काही प्रमाणात डेब्रिजची भरणी, सुकलेली तिवरांची झाडे व भरतीसोबत वाहून आलेली वाळू, दगड व कचरा असल्याचे निदर्शनास आले. सदर जागेचे जीपीएस रिडींग घेण्यात आले. ते पुढीलप्रमाणे

N 19 03 54 96     N 19 03 54 19
E 72 49 22 53     E 72 49 22 50

सदर पंचनामा आमच्या समक्ष करण्यात आला असून तो मराठी भाषेत आहे. सदर पंचनामा आम्हाला वाचून दाखविला व तो आम्हाला समजला.

पंच: १) हरीश. म. सालकर
(सही)
२) व्यंकटेश. लोखंडे

समक्ष
(सही)
तलाठी दांडा